# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २२/०६/२०२४ (शनिवार)**

---

**खोटया कागदपत्रांच्या आधारे टेंडर मिळवुन शासनाला बनावट औषधींचा पुरवठा करणारा आरोपी कळमेश्वर पोलीसांच्या अटकेत.**

दिनांक ०६/०२/२०२३ रोजी औषध निरीक्षक श्री नितीन पद्माकर भांडारकर हे अन्न व औषधी प्रशासन विभाग नागपुर यांनी ग्रामीण रूग्णालय कळमेश्वर येथे मेडीसीन पडताळणी करीता भेट दिली असता त्यांना Recip-500 Tablets, B.No. LC-44, Mfg. dt. 10/2022, Exp. Dt. 09/2024, Mfd. by M/s. Refant Pharma Pvt. Ltd., Plot No. L-89, MIDC, Kerala-364135 ही औषध बनावट असल्याचा संशय आल्याने त्यांनी सदर औषधीचा नमूना जप्त करून वैद्यनिक प्रयोगशाळा, मुंबई येथे चाचनी करीता पाठविला असता सदरची औषध ही बनावट असल्याबाबत अहवाल प्राप्त झाल्याने तसेच कोणत्याही औषधीचे निर्मीती व पुरवठा करण्यासाठी आवश्यक व अतिमहत्त्वाचे असणारे खोटे सी. ओ. ए. व जि.एम.पी. प्रमाणपत्र सादर करून त्याद्वारे शासनाकडुन ई टेन्डरीग मिळवुन शासनाला Recip-500 Tablets या बनावट औषधीचा पुरवठा केला असल्याने आरोपींविरूध्द पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे अप क्र. ५७/२०२४ कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१, २७६, ३४ भादवि प्रमाणे नोंद असुन तपासात आहे.

सदर गुन्हयातील मुख्य आरोपी विजय शैलेद्र चौधरी मालक रा. फ्लॅट नं. १९०७, बिल्डींग नं. ०८ पुनम क्लस्टर २, शांतीनगर, मिरा रोड ठाणे याने अटकपूर्व जामीनाकरिता मा. जिल्हा व सत्र न्यायालय नागपुर तसेच मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपुर येथे अर्ज दाखल केलेला होता. गुन्हयाचे तपासी अधिकारी मा. श्री. अनिल म्हस्के (भा.पो.से.) सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांनी तसेच त्याचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी आरोपीला अटकपूर्व जामीन मंजुर होवु नये याकरिता मा. न्यायालयामध्ये सरकारतर्फे बाजु मांडुन आरोपीचा अटकपूर्व जामीनाचा अर्ज नामंजुर करून घेतला व नंतर गुन्हयातील आरोपीची शोधकामी मीरा भाईंदर ठाणे येथे जावुन गुन्हयातील मुख्य आरोपी विजय शैलेद्र चौधरी मालक रा. फ्लॅट नं. १९०७. बिल्डींग नं. ०८ पुनम क्लस्टर २. शांतीनगर, मिरा रोड ठाणे यास ताब्यात घेवुन पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे आनुन गुन्हयात कायदेशिर अटक केली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात श्री. अनिल म्हस्के (भा पो.से.) सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर, पोउपनि दत्तात्रय कोलटे, पोशि मनिष सोनोने, पोशि नितेश पुसाम यांनी केलेली आहे.

## जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक

पोस्टे मौदा अंतर्गत धानला शिवार येथे दि. २१/०६/२०२४ चे ०९.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. लता कवडुजी कारेमोरे वय ४४ वर्ष रा. वार्ड क्र. ४ धानला ता. मौदा जि. नागपूर यांची बहीन सुनिता मारोती वेदय वय ५४ वर्ष हिला वडीलांनी १ एकर शेती यावर्षी स्वत: वाहायची होती त्याकरीता यातील आरोपी भाउ यास बोलली होती परंतु भाउ धनराज मारोती वैद्य, वय ५८ वर्ष यास तिला ती शेती दयायची नसल्याने तिचे सोबत वादविवाद करीत होता. व दि. २१/०६/२०२४ चे सकाळी ०९.३० वा. याच कारणा वरून भाऊ आरोपी क्र. १) धनराज वैदय व त्याचा मूलगा २) ओमदास धनराज वैदय दोन्ही रा. धानला ता. मौदा जि. नागपूर यांनी बहीन सुनिता सोबत झगडा भांडण करून तिचा जिव घेण्याचे उद्‌देशाने तिचे डोक्यावर काडीने मारले व रक्तबंबाळ झाली व शरीरावर लाथा बुक्यांनी मारून गंभीर जखमी केलेले आहे. जखमीचा वैद्यकीय उपचार सुरू आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून आरोपीविरूद्ध पोस्टे मौदा येथे कलम ३०७, ३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद केला असुन यातील दोन्ही आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि मनोज चौधरी हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे मौदा येथील ठाणेदार सतिशसिंग राजपूत, सपोनि मनोज चौधरी व स्टाफ यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर